महाराष्ट्र शासनाच्या यादीवरील अंक...
साप्ताहिक
RNI : MAH/MAR/2011/40762
पोस्टल नंबर : MCW/354/2021-23

# धगधगती मुंबई

website:www.dhagdhagtimumbai.in
E-mail : dhagdhagtimumbai@gmail.com

वर्ष : १६ अंक : ३४, संपादक - भिमराव हिंदुराव धुळप, मंगळवार, दिनांक ६ ऑक्टोबर २०२६ ते १२ ऑक्टोबर २०२६ पाने : ४ मूल्य : २ रुपये

## देशात हुकूमशाही लादण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला गाडून टाकू : उद्धव ठाकरे

मुंबई: मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि ईव्हीएमच्या विरोधात रविवारी मुंबईत काढण्यात आलेल्या 'गर्जना मोर्चा'ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मेट्रो सिनेमा ते मुंबई महापालिका मुख्यालयापर्यंत काढलेल्या या मोर्चात उन्हाचा कडाका असतानाही मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले. निवडणूक आयोग, ज्ञानेश कुमार तसेच केंद्र सरकारच्या निषेधाच्या घोषणा आणि फलकांनी परिसर दणाणून गेला.

यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. "आमचा लढा कोणत्याही एका पक्षाचा, व्यक्तीचा, जात किंवा धर्माचा नाही; हा आपल्या स्वातंत्र्याचा लढा आहे. देशात कोणी हुकूमशाह बनण्याचा प्रयत्न करत असेल, तर त्याला याच देशात गाडून टाकण्यासाठी आम्ही उभे आहोत," असा इशारा त्यांनी दिला.



मतदार यादीतील कथित फेरफारांचा आरोप करत ठाकरे यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ज्ञानेश कुमार यांची नियुक्ती पक्षपाती पद्धतीने झाल्याचा आरोपही त्यांनी केला. तसेच शेतकरी, महिला सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नांवरून राज्य व केंद्र सरकारवर निशाणा साधला.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही निवडणूक प्रक्रियेवर टीका करत "महाराष्ट्रातील एसआयआर रद्द करावा आणि यापुढे निवडणुका बॅलेट पेपरवर घ्याव्यात," अशी मागणी केली. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतील मतदारसंख्या वाढीवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले.

मोर्चात काँग्रेसचे बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)चे शशिकांत शिंदे, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, खासदार संजय राऊत, बाळा नांदगावकर यांच्यासह विविध पक्षांचे नेते सहभागी झाले.

## महाराष्ट्रातील ग्रामपंचायत निवडणुका लांबणीवर
### जानेवारी २०२७ मध्ये मतदानाची शक्यता

मुंबई : महाराष्ट्रातील आगामी ग्रामपंचायत निवडणुकांना मतदार याद्यांच्या विशेष पुनर्निरीक्षण कार्यक्रमामुळे विलंब होण्याची शक्यता आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या सुधारित कार्यक्रमानुसार ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यानंतर नोव्हेंबरच्या अखेरीस किंवा डिसेंबरमध्ये निवडणुकीचा अधिकृत कार्यक्रम जाहीर होऊ शकतो. त्यामुळे प्रत्यक्ष मतदान व निकाल जानेवारी २०२७ मध्ये होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, जानेवारी ते डिसेंबर २०२६ या कालावधीत कार्यकाळ संपणाऱ्या अंदाजे १४ हजार २३७ ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त करण्याचे आदेश ग्रामविकास विभागाने दिले आहेत. विकासकामांमध्ये खंड पडू नये, हा त्यामागील उद्देश असल्याचे सांगण्यात आले आहे. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना आवश्यक कायदेशीर कागदपत्रांसह जात पडताळणी प्रमाणपत्र किंवा जात वैधता प्रमाणपत्र निवडून आल्यानंतर १२ महिन्यांत सादर करण्याचे हमीपत्र देणे बंधनकारक राहणार आहे. अंतिम कार्यक्रमाबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकृत घोषणेची प्रतीक्षा आहे.




## धारावी पुनर्विकासाबाबत अफवा, गैरसमज दूर करण्यासाठी 'एक्सपिरियन्स सेंटर' महत्त्वाचे
## धारावीकरांना भविष्यातील घर, परिसर व रोजगाराच्या संधींचा प्रत्यक्ष अनुभव मिळणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई (भीमराव धुळप) :** धारावी पुनर्विकास प्रकल्पाबाबत नागरिकांच्या मनातील प्रश्न, संभ्रम आणि गैरसमज दूर करण्यासाठी 'धारावी एक्सपिरियन्स सेंटर' महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या केंद्राच्या माध्यमातून धारावीकरांना पुनर्विकासानंतर मिळणारे घर, परिसर, रस्ते, खुली मैदाने, सामाजिक सुविधा तसेच रोजगाराच्या संधी यांचे प्रत्यक्ष आणि डिजिटल स्वरूपात दर्शन घडणार आहे. त्यामुळे अफवा व अपूर्ण माहितीला आळा बसून पुनर्विकासाबाबत विश्वासाचे वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

पीएमजीपी कॉलनी, एच ब्लॉक, बीकेसीजवळ उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक 'धारावी एक्सपिरियन्स सेंटर'चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी केंद्राची पाहणी करून विविध विभागांची माहिती घेतली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, धारावी ही केवळ झोपडपट्टी नसून मुंबईच्या अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचे आर्थिक केंद्र आहे. कुंभारवाड्यातील मातीभांडी उद्योग, चामड्याचा व्यवसाय, अन्नप्रक्रिया, प्लास्टिक पुनर्चक्रीकरण तसेच विविध लघु-मध्यम उद्योगांमधून येथे मोठी अर्थव्यवस्था उभी राहिली आहे. धारावीची सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक ओळख जपत या उद्योगांना अधिक चांगल्या व नियोजित कार्यस्थळांची सुविधा देण्याचा प्रयत्न पुनर्विकास आराखड्यात करण्यात आला आहे. 'आजची धारावी आणि उद्याची धारावी' यामधील बदल नागरिकांना समजावून सांगण्याचे काम हे केंद्र करणार




आहे. पुनर्विकासानंतर आपले काय होणार, हा धारावीकरांच्या मनातील प्रश्न दूर करण्यासाठी केंद्रात रिअल टाइम माहिती, डिजिटल सादरीकरण आणि आधुनिक दृश्य-श्राव्य तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. या केंद्रात धारावीच्या वर्तमानापासून भविष्यातील नियोजित स्वरूपापर्यंतचा प्रवास दाखविण्यात आला आहे. रहिवाशांची घरे, रस्ते, खुल्या जागा, सामाजिक पायाभूत सुविधा आणि रोजगाराच्या संधी यांची माहिती एका ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांसह नागरी नियोजनाचा अभ्यास करणाऱ्या विविध घटकांसाठीही हे केंद्र उपयुक्त ठरणार आहे.

यावेळी बृहन्मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, धारावी पुनर्विकास प्रकल्प व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, सचिव विपीन पालिवाल, अदाणी नवभारत डेव्हलपर्स प्रा. लि.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल सरदाना, अदाणी समूहाचे व्यवस्थापकीय संचालक प्रणव अदानी आदी उपस्थित होते.

दरम्यान, प्रख्यात गायक शंकर महादेवन यांनी गायिलेल्या बदलत्या धारावीचे चित्र मांडणाऱ्या 'धारावी का कल' या विशेष गीताचे लॉंचिंग तसेच 'मेरे सपनों की धारावी' या पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

## नवी मुंबईत ६ ऑक्टोबरला १६ तास पाणीपुरवठा बंद; ७ ऑक्टोबरला कमी दाबाने पाणी

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत मोरबे मुख्य जलवाहिनी व भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्राशी संबंधित विविध देखभाल व तांत्रिक कामे करण्यात येणार आहेत. यासाठी मंगळवार, ६ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते बुधवार, ७ ऑक्टोबर रोजी पहाटे २ वाजेपर्यंत एकूण १६ तास पाणीपुरवठा बंद राहणार आहे. या कालावधीत भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्रातील सम्पचा चॅनेल विलग करण्यासाठी एम.एस. प्लेट बसविणे, नवीन मीटरिंग किऑस्क व २०५० मि.मी. व्यासाच्या मोरबे जलवाहिनीवर फ्लो मीटर बसविण्यात येणार आहे. तसेच सीबीडी सेक्टर-७, वाशी अरेंजा सर्कल आणि महापे येथे विविध क्षमतेचे बटरफ्लाय व्हॉल्व्ह बसविण्याचे काम होणार आहे. यामुळे बेलापूर, नेरुळ, वाशी, तुर्भे-सानपाडा, कोपरखैरणे, घणसोली व ऐरोली तसेच सिडकोच्या खारघर व कामोठे परिसरातील पाणीपुरवठा बंद राहील. ७ ऑक्टोबरला सकाळी व सायंकाळी कमी दाबाने पाणीपुरवठा होणार असल्याने नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

## संपादकीय

# धारावीचा पुनर्विकास हवा, पण संभ्रम नको!

मुंबईच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत धारावीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. धारावी ही केवळ झोपडपट्टी म्हणून पाहण्याची जागा नाही, तर मेहनती माणसांनी आपल्या कष्टातून उभी केलेली एक मोठी आर्थिक, सामाजिक आणि औद्योगिक वसाहत आहे. कुंभारवाडा, चामड्याचा व्यवसाय, अन्नप्रक्रिया, प्लास्टिक पुनर्प्रक्रीकरण, लघुउद्योग, घरगुती उद्योग आणि विविध प्रकारच्या व्यवसायांमुळे धारावीने मुंबईच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे धारावीचा पुनर्विकास हा केवळ इमारती उभारण्याचा विषय नसून लाखो लोकांच्या भवितव्याशी जोडलेला प्रश्न आहे.

धारावीचा नियोजित, आधुनिक आणि सर्वसमावेशक पुनर्विकास व्हावा, अशी अपेक्षा अनेक वर्षांपासून व्यक्त होत आहे. धारावीकरांनाही चांगले घर, स्वच्छ परिसर, रुंद रस्ते, मोकळ्या जागा, शाळा, आरोग्य सुविधा, रोजगाराच्या संधी आणि सुरक्षित जीवनमान हवे आहे. त्यामुळे पुनर्विकासाला विरोध करण्यापेक्षा तो योग्य पद्धतीने, पारदर्शकतेने आणि धारावीकरांच्या विश्वासात घेऊन व्हावा, हीच खरी अपेक्षा आहे. याच पार्श्वभूमीवर 'धारावी एक्सपिरियन्स सेंटर'ची उभारणी ही महत्त्वाची बाब मानली जात आहे. या केंद्राच्या माध्यमातून आजची धारावी आणि उद्याची नियोजित धारावी नागरिकांना प्रत्यक्ष तसेच डिजिटल स्वरूपात दाखविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या केंद्राचे उद्घाटन झाले. पुनर्विकासानंतर नागरिकांना मिळणारी घरे, रस्ते, सामाजिक सुविधा, मोकळ्या जागा आणि रोजगाराच्या संधी यांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा उद्देश या केंद्रामागे आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनीही या केंद्रामुळे अफवा, गैरसमज आणि अपूर्ण माहितीला आळा बसेल आणि धारावीकरांमध्ये पुनर्विकासाबाबत विश्वासाचे वातावरण निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. हा विश्वास निश्चितच महत्त्वाचा आहे. मात्र, विश्वास निर्माण करण्यासाठी माहिती किती आणि कशी दिली जाते, हे त्याहून महत्त्वाचे आहे. आज धारावीकरांच्या मनात याच मुद्द्यावरून एक प्रश्न निर्माण झाला आहे. पुनर्विकासानंतर मिळणाऱ्या घरांच्या क्षेत्रफळाबाबत नेमकी वस्तुस्थिती काय?

'धारावी एक्सपिरियन्स सेंटर'मध्ये ३५० चौरस फुटांच्या घराची माहिती किंवा प्रतिकृती दाखविण्यात येत असल्याचे सांगितले जात आहे. दुसरीकडे धारावीतील विद्यमान इमारतींमधील पात्र रहिवाशांना ५५० चौरस फुटांचे घर देण्यात येणार असल्याची चर्चा आणि माहिती नागरिकांमध्ये आहे. जर ५५० चौरस फुटांचे घर मिळणार असेल, तर त्या घराचे स्वरूप काय असेल? त्याचा आराखडा कसा असेल? किती खोल्या असतील? स्वयंपाकघर, स्नानगृह, बाल्कनी किंवा इतर सुविधा कशा असतील? घराची प्रत्यक्ष रचना कशी दिसेल? या प्रश्नांची उत्तरे नागरिकांना स्पष्टपणे मिळणे आवश्यक आहे.

कारण घर हा केवळ चौरस फुटांचा आकडा नसतो. ते एका कुटुंबाचे भवितव्य असते. धारावीतील अनेक कुटुंबे पिढ्यानपिढ्या एकाच परिसरात राहत आहेत. त्यांच्या घराशी, व्यवसायाशी, शेजारधर्माशी आणि सामाजिक संबंधांशी भावनिक नाते जोडलेले आहे. त्यामुळे पुनर्विकासानंतर त्यांना नेमके काय मिळणार आहे, हे त्यांना स्पष्टपणे समजणे अत्यंत गरजेचे आहे.

३५० चौरस फूट आणि ५५० चौरस फूट यामधील संभ्रम तातडीने दूर करणे आवश्यक आहे.

प्रशासनाने किंवा संबंधित प्राधिकरणाने या विषयावर अधिकृत आणि स्पष्ट माहिती नागरिकांसमोर ठेवली पाहिजे. कोणत्या श्रेणीतील रहिवाशांना किती क्षेत्रफळाचे घर मिळणार आहे, पात्रतेचे निकष काय आहेत, विद्यमान इमारतीतील रहिवाशांसाठी कोणती तरतूद आहे, व्यावसायिकांना काय मिळणार आहे आणि पुनर्वसनाची संपूर्ण प्रक्रिया कशी असेल, याचे सुस्पष्ट सादरीकरण 'धारावी एक्सपिरियन्स सेंटर'मध्ये असायला हवे.

जर एखाद्या नागरिकाला ३५० चौरस फुटांचे घर मिळणार असेल, तर त्याचे मॉडेल दाखवावे. ५५० चौरस फुटांचे घर मिळणार असेल, तर त्याचेही स्वतंत्र मॉडेल दाखवावे. दोन्ही घरांमधील फरक नागरिकांना प्रत्यक्ष पाहता आला पाहिजे. केवळ संगणकीय चित्रे किंवा आकडेवारी न दाखवता 'तुम्हाला मिळणारे घर प्रत्यक्षात असे दिसेल', असा अनुभव नागरिकांना देणे हेच खरे 'एक्सपिरियन्स सेंटर' ठरेल. धारावीकरांच्या मनात आधीच अनेक वर्षांच्या चर्चेमुळे अनेक प्रश्न आहेत. पुनर्विकास कधी होणार, कोण पात्र ठरणार, घर किती मोठे असेल, व्यवसायाचे काय होणार, संक्रमण काळात कुठे राहायचे, नवीन घर कोणत्या भागात मिळणार, रोजगाराची व्यवस्था कशी होणार, अशा असंख्य प्रश्नांची उत्तरे त्यांना हवी आहेत. या प्रश्नांकडे केवळ विकासाच्या दृष्टीने न पाहता मानवी दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. धारावीचा पुनर्विकास हा केवळ शासन, विकासक किंवा प्रशासनाचा प्रकल्प नाही. तो धारावीकरांच्या जीवनाचा प्रश्न आहे. त्यामुळे प्रत्येक टप्प्यावर नागरिकांना माहिती देणे, त्यांचे म्हणणे ऐकणे आणि शंकांचे निरसन करणे आवश्यक आहे. विकासाचा वेग महत्त्वाचा आहेच; परंतु त्याहून महत्त्वाचा आहे विश्वासाचा वेग. नागरिकांचा विश्वास मिळाला तर पुनर्विकास अधिक सुलभ होईल.

धारावीतील उद्योग आणि व्यवसायांचे काय होणार, हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे. धारावीची अर्थव्यवस्था केवळ घरांवर उभी नाही. हजारो कुटुंबांचे उदरनिर्वाहाचे साधन छोटे-मोठे उद्योग आणि व्यवसाय आहेत. त्यामुळे नव्या धारावीमध्ये घरासोबत रोजगार आणि व्यवसायासाठी जागा उपलब्ध झाली पाहिजे. 'आधुनिक धारावी' उभारताना तिची आर्थिक ओळख नष्ट होता कामा नये.

त्याचप्रमाणे पुनर्विकासानंतरची शाळा, रुग्णालये, उद्याने, सार्वजनिक सुविधा, वाहतूक व्यवस्था, पाणीपुरवठा, मलनिस्सारण, पार्किंग आणि नागरिकांच्या दैनंदिन गरजा यांची माहितीही नागरिकांना समजण्यास सोप्या भाषेत देणे गरजेचे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धारावीला आर्थिक इंजिन म्हणून संबोधले आहे. ही भूमिका स्वागतार्ह आहे. मात्र आर्थिक इंजिन म्हणून धारावीचा सन्मान राखायचा असेल, तर त्या इंजिनामागे उभ्या असलेल्या सामान्य माणसाचाही सन्मान राखला पाहिजे. धारावीकरांना केवळ उंच इमारतींची स्वप्ने दाखवून चालणार नाही; त्या इमारतींमध्ये त्यांचे घर कुठे असेल, ते किती मोठे असेल आणि त्यांचे जीवन कसे बदलेल, हे स्पष्टपणे दाखवावे लागेल. धारावीचा पुनर्विकास व्हायलाच हवा; पण तो धारावीकरांच्या विश्वासाने, सहभागाने आणि पारदर्शकतेने झाला पाहिजे.

'धारावी एक्सपिरियन्स सेंटर' हे केवळ प्रकल्पाचे प्रदर्शन केंद्र न राहता धारावीकरांच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देणारे विश्वासाचे केंद्र बनले पाहिजे. ३५० आणि ५५० चौरस फुटांच्या घरांबाबत असलेला संभ्रम तातडीने दूर करून दोन्ही प्रकारच्या घरांचे नमुने, आराखडे आणि अधिकृत माहिती नागरिकांसमोर ठेवली, तर या केंद्राचा खरा उद्देश साध्य होईल.

धारावीकरांना विकास नको असे नाही; उलट त्यांना विकास हवा आहे. त्यांना आधुनिक घर हवे आहे, चांगले जीवनमान हवे आहे, सुरक्षित भविष्य हवे आहे. मात्र त्यांना 'काय मिळणार?' याचे स्पष्ट उत्तर हवे आहे. हे उत्तर जितके पारदर्शक असेल, तितका पुनर्विकासावरील विश्वास मजबूत होईल.

शेवटी एवढेच—धारावीला नव्या रूपात उभे करताना धारावीकरांच्या स्वप्नांनाही त्या नव्या धारावीमध्ये जागा मिळाली पाहिजे. विकासाच्या आराखड्यात इमारतींची उंची मोजण्याइतकेच नागरिकांच्या विश्वासाची खोलीही मोजली गेली पाहिजे.

धारावीचा पुनर्विकास करा; पण धारावीकरांना संभ्रमात ठेवू नका.

# यंदाच्या नवरात्रीतील शक्तीचे नऊ रंग कोणते? जाणून घ्या प्रत्येक रंगाचे महत्त्व

**मुंबई :** शारदीय नवरात्रोत्सवाला सुरुवात होताच सर्वत्र भक्तिमय आणि उत्साहाचे वातावरण निर्माण होते. आदिशक्तीच्या नऊ रूपांची भक्तिभावाने आराधना करताना नवरात्रीच्या प्रत्येक दिवसाला विशिष्ट रंगाचे महत्त्व दिले जाते. या रंगांची परंपरा केवळ धार्मिक श्रद्धेपुरती मर्यादित नसून, सकारात्मकता, ऊर्जा, शांतता, समृद्धी आणि नवचैतन्याशीही तिचा संबंध जोडला जातो. नवरात्रीच्या नऊ दिवसांत भाविक आपल्या पोशाखात, पूजासजावटीत तसेच घरातील वातावरणात त्या दिवसाच्या रंगाचा समावेश करून उत्सव साजरा करतात. त्यामुळे नवरात्रोत्सवाला भक्तीबरोबरच रंगांचीही विशेष झळाळी प्राप्त होते.

**नवरात्रीचे नऊ रंग आणि त्यांचे महत्त्व**

**१. केशरी : ऊर्जा आणि उत्साह**

केशरी रंग उत्साह, धैर्य आणि सकारात्मक ऊर्जेचे प्रतीक मानला जातो. नवरात्रीच्या उत्सवी वातावरणात हा रंग चैतन्य आणि उत्साह निर्माण करतो.

**२. पांढरा: शांतता आणि पवित्रता**

पांढरा रंग शांतता, निर्मळता आणि पवित्रतेचे प्रतीक मानला जातो. सात्त्विकता आणि मन:शांतीशी या रंगाचा संबंध जोडला जातो.

**३. लाल : शक्ती आणि आत्मविश्वास**

लाल रंग हा शक्ती, प्रेम, उत्साह आणि आत्मविश्वासाचे प्रतीक आहे. देवीच्या उपासनेत लाल रंगाला विशेष धार्मिक महत्त्व दिले जाते.

**४. निळा : स्थैर्य आणि विश्वास**

निळा रंग शांतता, स्थैर्य आणि विश्वास दर्शवतो. मनाला स्थिरता देणारा आणि सकारात्मक विचारांना प्रोत्साहन देणारा रंग म्हणून त्याकडे पाहिले जाते.

**५. पिवळा : आनंद आणि ज्ञान**

पिवळा रंग आनंद, ज्ञान, आशावाद आणि सकारात्मकतेचे प्रतीक मानला जातो.




उत्सवाच्या वातावरणात या रंगामुळे प्रसन्नता वाढते.

**६. हिरवा : निसर्ग आणि समृद्धी**

हिरवा रंग निसर्ग, वाढ, समृद्धी आणि नवचैतन्याचे प्रतीक आहे. नवीन सुरुवात आणि सकारात्मक बदलांचा संदेश या रंगातून दिला जातो.

**७. राखाडी : संतुलन आणि संयम**

राखाडी रंग स्थिरता, संयम आणि संतुलनाचे प्रतीक मानला जातो. जीवनातील चढ-उतारांमध्ये समतोल राखण्याचा संदेश या रंगाशी जोडला जातो.

**८. जांभळा : आध्यात्मिकता आणि वैभव**

जांभळा रंग आध्यात्मिकता, सामर्थ्य आणि वैभवाचे प्रतीक मानला जातो. भक्ती, आत्मचिंतन आणि अंतर्मुखतेची भावना जागृत करणारा रंग म्हणून त्याचे महत्त्व सांगितले जाते.

**९. मोरपंखी – सौंदर्य आणि सकारात्मकता**

मोरपंखी रंग सौंदर्य, शांतता आणि सकारात्मकतेचे प्रतीक मानला जातो. नवरात्रोत्सवाच्या अंतिम टप्प्यात उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण करण्यासाठी हा रंग विशेष आकर्षण ठरतो.

**नऊ रंगांचा उत्सव का?**

नवरात्रीतील रंगांची परंपरा श्रद्धा, संस्कृती आणि उत्सवाच्या आनंदाशी जोडलेली आहे. प्रत्येक दिवशी विशिष्ट रंगाचे वस्त्र परिधान करण्याची पद्धत अनेक भागांत लोकप्रिय झाली आहे. त्यामुळे नवरात्रोत्सवात भक्तीबरोबरच एक वेगळी रंगत आणि उत्साह पाहायला मिळतो.

मात्र, नवरात्रीच्या रंगांची क्रमवारी आणि दिवसानुसार रंग प्रदेश, पंचांग, स्थानिक परंपरा तसेच संबंधित वर्षानुसार बदलू शकतात. त्यामुळे आपल्या परिसरातील परंपरा किंवा अधिकृत पंचांगानुसार त्या दिवसाचा रंग तपासणे योग्य ठरते.

**नवरात्र म्हणजे भक्ती आणि रंगांची अनुभूती!**

नऊ दिवसांची भक्ती, नऊ रंगांची ऊर्जा आणि आदिशक्तीच्या उपासनेचा हा पवित्र उत्सव. देवीच्या चरणी श्रद्धा अर्पण करताना प्रत्येकाच्या जीवनात सुख, समृद्धी, सकारात्मकता आणि नवचैतन्याचे रंग भरू देत, हीच प्रार्थना. धगधगती मुंबई परिवारातर्फे सर्वांना शारदीय नवरात्रोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा.

# धर्मसंस्कार, शिवपरंपरा आणि जनजागृतीचा अखंड प्रवास

## गुरुवर्य नीलकंठ शिवाचार्य महास्वामी धारेश्वर महाराज

११ सप्टेंबर १९६३ रोजी अविधवा नवमीच्या दिवशी सकाळी शिवरवाडी येथे आनंदाची बातमी आली. ऐन निवडणूक प्रचाराच्या काळात शिराळा तालुका उत्तर विभागात या जन्माचा आनंद पेढे व साखर वाटून व्यक्त करण्यात आला. सर्वपक्षीय उमेदवार व प्रचारकांनी शिवरवाडी येथे भजन-जागर करून वामदेवमुखोत्पन्न दारुकाचार्य परंपरेतील उज्जयिनी पीठाच्या धारेश्वर मठाच्या गुरु परंपरेला उजाळा दिला. बिळाशी येथे इंग्रजी ध्वज उतरवून तिरंगा फडकविणारे तरुण स्वातंत्र्यसैनिक पांडुतात्यांच्या पुत्राचे नाव वोमराज आणि तुकाराम असे सुचविण्यात आले. मात्र भजनी मंडळींच्या आग्रहामुळे 'तुकाराम' हेच नाव रूढ झाले.

२३ जून १९८१ रोजी शिवैक्य गुरुकुल भूषण श्री षट्स्थलब्रह्मी प्रणवस्वरूपी १०८ सद्गुरू मल्लिकार्जुनबाबा शिवाचार्य धारेश्वर महाराज यांनी तुकाराम यांचे दत्तक विधान केले. त्यानंतर 'नीलकंठ गुरु मल्लिकार्जुन स्वामी' या नावाने त्यांनी धार्मिक व संस्कृत शिक्षणास प्रारंभ केला. पंढरपूर मठाचे धर्माधिकारी बार्शी, भागवत सर, कंटक सर, जावडेकर सर, जाखलेकर सर कराड तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या मार्गदर्शनातून त्यांनी संस्कृत विशारद शिक्षण घेतले.

त्यांचे प्राथमिक शिक्षण तिसरीपर्यंत शिवरवाडी, पणुंब्रे तर्फे शिराळा येथे झाले. चौथी ते सातवीपर्यंत जिल्हा परिषद मराठी शाळा, टाकवे आणि दहावीपर्यंत टाकवे हायस्कूल येथे शिक्षण घेतल्यानंतर अकरावी-बारावीचे शिक्षण विश्वासराव नाईक महाविद्यालय, शिराळा येथे झाले.

३१ जानेवारी १९८५ रोजी माघ शुद्ध



दशमी, गुरुवारी बाबाजी श्री षट्स्थलब्रह्मी मल्लिकार्जुन शिवाचार्य स्वामीजी यांच्या चरणांखाली त्यांचा विधिवत पट्टाभिषेक व पीठारोहण सोहळा झाला. मठ संस्थानच्या एकत्रीकरणाच्या प्रकरणामुळे न्यायालयीन कामकाजासाठी उपस्थित राहावे लागल्याने काशी, हरिद्वार, म्हैसूर, तिरुपती किंवा श्रीशैल येथे पुढील शिक्षण घेता आले नाही. मात्र संस्कृत, हिंदी तसेच जुजबी इंग्रजी भाषेचे ज्ञान आत्मसात करून त्यांनी प्रवचन, कीर्तन, आख्यान, शिवकथा, पदयात्रा, रथयात्रा तसेच सामूहिक प्रवासाच्या माध्यमातून धर्मप्रचार, धर्मप्रसार आणि धर्मसंस्काराचे कार्य अखंड सुरू ठेवले.

राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य अमदापूरकर महाराज आणि रेवणसिद्ध शिवाचार्य पंडकर महाराज यांच्या आशीर्वाद व मार्गदर्शनाखाली 'परमरहस्य' ग्रंथ, पुरोहितांसाठी 'बृहत् शिवार्चन पद्धती', शिवपाठ व शक्तीपाठ यांच्या माध्यमातून धार्मिक जनजागृतीचे कार्य त्यांनी केले. जगद्गुरू पंचाचार्य उत्सव, हजारो सामूहिक पारायणे आणि विविध धार्मिक उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी समाजात धर्मसंस्कार रुजविण्याचा प्रयत्न केला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेतून हिंदवी स्वराज्य शपथदिनोत्सव चैत्र शुद्ध सप्तमीला रायरेश्वर येथे तसेच ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. शेकडो पुरोहित व जंगम बांधवांच्या सहभागातून शिंगणापूर, बनेश्वर, हरिहरेश्वर, जगदीश्वर, धारेश्वर, केदारेश्वर, मार्लेश्वर आणि धोपेश्वर आदी शिवस्थानी सामूहिक लघुरुद्र करण्यात आले. अनेक शिवाचार्य महाराजांच्या सहकार्याने त्यांनी धर्मप्रचार व समाजप्रबोधनाची परंपरा पुढे नेली.

नीलकंठ शिवाचार्य महास्वामी धारेश्वर महाराज यांचा हा प्रवास केवळ धार्मिक कार्यापुरता मर्यादित नसून, शिवपरंपरा, संस्कार, अध्यात्म, सामाजिक एकजूट आणि जनजागृती यांचा संगम घडविणारा प्रेरणादायी प्रवास ठरला आहे.

( लेखक - हरिश्चंद्र जंगम )

## शिवसेनाप्रमुखांच्या जन्मशताब्दीनिमित्त शिवसेना अपंग सहाय्य सेनेचा अभिनव उपक्रम

# पाच पीएचडी धारकांचा करणार गौरव







**मुंबई:** हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शिवसेना अपंग सहाय्य सेनेतर्फे अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. शिवसेना, दैनिक सामना तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील अग्रणी समाजसुधारक प्रबोधनकार ठाकरे यांच्या जीवनकार्यावर विविध विद्यापीठांत प्रबंध सादर करून पीएचडी पदवी प्राप्त केलेल्या संशोधकांचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे. लोकसभेचे माजी अध्यक्ष व माजी मुख्यमंत्री प्रा. मनोहर जोशी यांनी शिवसेनेवर प्रबंध सादर करून पीएचडी मिळविली होती. 'शिवसेनेचे मानवतावादी कार्य' या विषयावर सरिता विजय वाकोडे यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून पीएचडी प्राप्त केली आहे. ज्येष्ठ संपादक डॉ. सुकृत खांडेकर यांनी सामना या दैनिकावर लोकमान्य टिळक विद्यापीठ, पुणे येथून पीएचडी मिळविली आहे. तसेच डॉ. अनंत गुरव आणि मनीष देशमुख यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या जीवनकार्यावर संशोधन करून पीएचडी प्राप्त केली आहे. या संशोधकांचा सन्मान रविवार, १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात करण्यात येणार आहे. माजी केंद्रीय मंत्री व शिवसेना नेते खासदार अरविंद सावंत यांच्या हस्ते हा गौरव होणार असून, पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती शिवसेना अपंग सहाय्य सेनेचे अध्यक्ष सूर्यकांत लाडे यांनी दिली.

# 8 तास ड्यूटीचा आदेश फक्त कागदावरच मुंबई पोलिसांच्या ताणावर संजय राऊतांचे मुख्यमंत्र्यांना आवाहन

**मुंबई :** मुंबईसह राज्यभरात घडणाऱ्या वेगवान राजकीय व सामाजिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर पोलीस दलातील अंमलदार आणि शिपाई वर्गावर प्रचंड ताण आला आहे. त्यांची अक्षरशः पिळवणूक होत असल्याची टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे. पोलीस हा देखील हाडामांसाचा माणूस असून त्यालाही कुटुंबीय आणि स्वतःचे आयुष्य आहे.

त्यामुळे कागदावरील ८ तास ड्युटी'चा नियम प्रत्यक्ष पोलीस ठाण्यांमध्ये आणि बंदोबस्ताच्या ठिकाणी काटेकोरपणे लागू करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्र्यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात म्हटले की, "महाविकास आघाडी सरकारच्या काळात, तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी ४ मे २०२२ रोजी बृहन्मुंबई पोलीस दलातील अंमलदारांसाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दिलासादायक स्थायी आदेश जारी केला होता. अपवादात्मक परिस्थिती वगळता पोलिसांना ८ तास ड्युटी आणि १६ तास आराम देण्याचे स्पष्ट निर्देश या आदेशात देण्यात आले होते. आज दुर्दैवाने या शासन निर्णयाची अंमलबजावणी केवळ कागदावरच उरली आहे." असे म्हणत खंत व्यक्त केली.

"वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर केला जाणारा ड्यूटीचा रोस्टर (तक्ता) पाहिला, तर पोलीस शिपाई ८-८-८ तासांच्या तीन शिफ्टमध्ये काम करत असल्याचे भासवले जाते. मात्र, वास्तवात मैदानावर काम करणाऱ्या सामान्य पोलीस अंमलदाराकडून दररोज १२ तास किंवा त्याहून अधिक काळ काम करवून घेतले जाते." असे म्हणत खासदार राऊत यांनी टीका केली. "कनिष्ठ पोलिसांना जास्तीचे तास राबवून घेण्याचे हे प्रकार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या केवळ 'तोंडी आदेशा'नुसार चालतात.

मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता कायदा व सुव्यवस्था राखताना पोलिसांचे मनुष्यबळ अपुरे पडत असल्याने वरिष्ठांचाही नाईलाज होतो, ही वस्तुस्थिती आहे." असे म्हणत पोलीस दलातील अंतर्गत वास्तव मांडले.

# "बेंगलोर येथील निखिल प्रॉडक्टसची" पानडी, हिना अगरबत्ती बाजारात !

**मुंबई:** निखिल प्रॉडक्टस बेंगलोरच्या अगरबत्ती कंपनीने येणाऱ्या सण उत्सवासाठी श्रावण, गणपती, दसरा, दिवाळी या सणांचे औचित्य साधून पानडी, हिना, कृष्णलीला, अपर्ण व सॅन्डलवुड या पाच प्रकारच्या अगरबत्ती बाजारामध्ये उपलब्ध केल्या आहेत. पूजा किंवा धार्मिक विधीमध्ये अगरबत्तीला विशेष महत्त्व दिले गेले आहे. असे मानले जाते की देवाची पूजा करत असताना आपले मन संपूर्णपणे प्रार्थनेस विलिन व्हावे, यासाठी अगरबत्तीच्या मनमोहक सुवासाची मदत होते. पानडी ही अगरबत्ती उच्च दर्जाच्या पाचोली अत्तर व हलमड्डी पासून तयार केलेली असून हँडमेड नॅचरल मसाला अगरबत्ती ५० ग्रॅम आकर्षक पॅकिंगमध्ये उपलब्ध आहे. हिना अगरबत्ती उच्च दर्जाच्या हिना अत्तर व हलमड्डी नॅचरल मसाला पासून तयार केलेली हँडमेड नॅचरल मसाराला अगरबत्ती ५० ग्रॅम आकर्षक पॅकिंगमध्ये उपलब्ध आहे. हिना, पानडी, कृष्णालिला, अपर्ण व सॅन्डवुड ह्या अगरबत्या मुंबई, ठाणे, कोकण, पुणे, नाशिक, बीड सह संपूर्ण महाराष्ट्रात उपलब्ध आहे. आमचे मुंबईचे प्रमुख विक्रेते आचार्य प्रॉडक्टस् ६ संगीत सागर लक्ष्मी नारायण, माटुंगा (पुर्व), मुंबई-४०००१९ संपर्क क्र. ०२२-२४०२६६९१ आणि ठाणे येथे आचार्य प्रॉडक्टस् शॉप ३/४ हॉटेल प्रिन्स, अशोक टॉकीज शेजारी, स्टेशन रोड, ठाणे (पश्चिम) - ४००६०१ येथे संपर्क करावा.

# खेळाडूंसाठी पाच टक्के नोकरीत आरक्षण आजपासून नवे धोरण लागू

मुंबई : राज्यातील गुणवंत खेळाडूंना सरकारी नोकरीत देण्यात येणाऱ्या ५ टक्के समांतर आरक्षणाचे धोरण आजपासून लागू करण्यात आले आहे. शासन निर्णयानुसार, मंत्रालयीन विभाग, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायती, महापालिका, नगरपालिका, शासकीय मंडळे-महामंडळे, विद्यापीठे, शासकीय अनुदानित शैक्षणिक संस्था, आश्रमशाळा तसेच शासनाकडून अनुदान मिळणाऱ्या विविध संस्थांमधील गट अ, ब, क आणि ड वर्गातील सरळसेवा पदांवर ५ टक्के खेळाडू आरक्षण लागू राहणार आहे.महाराष्ट्र सरकारने याबाबतचे धोरण अधिक कडक आणि पारदर्शक केले आहे. यापुढे केवळ क्रीडा प्रमाणपत्र दाखवून आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही. प्रमाणपत्राची 'क्रीडा ई-प्रमाण' प्रणालीद्वारे ऑनलाइन पडताळणी बंधनकारक करण्यात आली असून, बनावट प्रमाणपत्रांना आळा घालण्यासाठी संपूर्ण प्रक्रियेला डिजिटल आणि 'ब्लॉकचेन'ची जोड देण्यात आली आहे. खेळाडू आरक्षणातून नोकरीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराला 'क्रीडा ई-प्रमाण' प्रणालीतून जारी झालेले प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्र नसेल तर परीक्षेच्या पहिल्याच टप्प्यात अर्ज बाद केला जाणार आहे. निवड झाल्यानंतर नियुक्ती प्राधिकरणाकडून प्रमाणपत्रावरील क्यूआर कोड स्कॅन करून पुन्हा पडताळणी केली जाणार आहे. यापुढे क्रीडा स्पर्धा संपल्यानंतर संबंधित संघटनांना ३० दिवसांच्या आत अंतिम निकाल तसेच सहभागी खेळाडूंची यादी आणि गुणपत्रिका 'क्रीडा ई-प्रमाण' पोर्टलवर अपलोड करावी लागणार आहे. ही माहिती ब्लॉकचेनवर कायमस्वरूपी नोंदवली जाणार असून, मुदतीत माहिती न देणाऱ्या संघटनेला स्वयंचलितपणे 'डिफॉल्टर' यादीत टाकले जाणार आहे. त्यामुळे संघटनांच्या मनमानीला आणि प्रमाणपत्रांच्या गैरव्यवहाराला चाप बसणार आहे.

MAITREYA BAHUUDDESHIYA SEVABHAVI SANSTHA'S
G.K.S. COLLEGE OF ARTS, COMMERCE & SCIENCE
KHADAVLI TAL. KALYAN, DIST. THANE
(Affiliated to University of Mumbai)
Advt. No.: GKSCollege/Ph. D/Admission/2026-27

PH. D. ADMISSIONS IN HISTORY, 2026-27

Applications are invited for the Ph. D Programme in History subject from eligible candidates as per University of Mumbai "PhD Regulations 2025". Applications must fulfil the following criteria:

1. A Master's Degree (M.A.) in History from UGC recognized University with at least 55% marks or Equivalent Grade. 50% marks for applicants belonging to SC/ ST/ OBC (Non creamy layer)/ Differently abled and other categories as per University of Mumbai Guidelines
2. NET/SET/M.Phil.

Candidate shall prepare an application on a plain white paper with necessary information of personal details, educational qualifications, communication address, email ID, Contact Number etc and send hard copy to **The Principal, G. K. S. College of Arts, Commerce & Science, Khadavali, Ta. Kalyan Dist. Thane PIN-421605** and soft copy of the same online gkscollege@gmail.com within 15 days of this advertisement. Attested copies of all the essential documents must be attached with the application.

Sd/-
Principal

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
मध्य मुंबई (सा.बां) विभाग, गणपत जाधव मार्ग,
वरळी, मुंबई - ४०० ०१८.

Email :- centralmumbai.ee@mahapwd.gov.in
जा.क्र. का.अ./ममुंवि/निविदा/ ३०६४
दिनांक :- २८/०९/२०२६

ई निविदा सूचना क्रमांक १६ सन (२०२६-२७)

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २४९३११०२/२४९३६४०४ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील मजूर सहकारी संस्था मर्यादित यांचेकडून एकुन ११ कामांची ई-निविदा http://mahatenders.gov.in/http://mahapwd.gov.in मागवित आहेत. सर्व मजूर सहकारी संस्थां,मुंबई जिल्हा यांनी प्रचलित नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, वरळी, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी - | दि.०५.१०.२०२६, सकाळी १०.०० पासून ते दि.१२.१०.२०२६ रोजी १७.०० पर्यंत |
| ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) | दि.१३.१०.२०२६ रोजी १७.०० वाजता (कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, यांचे कार्यालय, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई ४०००१८) |

कार्यकारी अभियंता,
मध्य मुंबई (सा.बां) विभाग,
वरळी, मुंबई.

आरओसी 2026 - 27/क्र 5/ C 3089

# रयत शिक्षण संस्थेतून नवे एकलव्य घडत आहेत -संजय आवटे

**सातारा (विजय जाधव) :** बदलत्या युगातील आव्हानांना सामोरे जाताना १०७ वर्षांचा प्रदीर्घ वारसा असलेली रयत शिक्षण संस्था महत्त्वाची भूमिका बजावत आहे. मन, मेंदू आणि मनगट यांचे एकात्म नाते असणारे विद्यार्थी घडविणे ही आजच्या काळाची गरज असून, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या दूरदृष्टीचा वारसा पुढे नेणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. रयत शिक्षण संस्थेतून नवे एकलव्य घडत आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत, लेखक व वक्ते संजय आवटे यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या १०७ व्या वर्धापन दिन सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी होते. यावेळी खासदार सुप्रिया सुळे, उपाध्यक्ष एम. बी. शेख, व्हा. चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, संघटक डॉ. अनिल पाटील, कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार बाळाराम पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. माध्यमांच्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर त्यांचा योग्य वापर करण्याची गरज व्यक्त




करत आवटे यांनी विचारसमृद्ध आणि स्वतंत्र विचार करणारी पिढी घडविण्याचे आवाहन केले. चेअरमन दळवी यांनी रयत शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखड्याच्या माध्यमातून संस्थेच्या गुणात्मक व संख्यात्मक विकासावर भर देण्याची भूमिका मांडली. यावेळी गुणवंत विद्यार्थी, शिक्षक व विविध क्षेत्रांत योगदान देणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी, पदाधिकारी व शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वेतनाचा नवीन टॅब सुरू होईपर्यंत पूर्वीप्रमाणे वेतन देण्याची शिक्षक भारतीची मागणी

**मुंबई :** राज्यात शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीची घोषणा झाली असून नवरात्रोत्सव व दिवाळीचे सण तोंडावर आले आहेत. अशा परिस्थितीत अतिरिक्त ठरविण्यात आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन थांबविण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. कोणतीही पूर्वसूचना अथवा अधिकृत पत्रक न काढता वेतनाचा टॅब थांबविणे योग्य नसल्याचे सांगत शिक्षक भारती संघटनेने याबाबत तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

या मागणीसाठी माजी शिक्षक आमदार कपिल पाटील आणि कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांची भेट घेतली. संचमान्यतेचे निकष बदलल्यामुळे अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त ठरविले जात असल्याचा आरोप



संघटनेने केला आहे. त्यामुळे नवीन वेतन टॅब सुरू होईपर्यंत अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन पूर्वीप्रमाणे सुरू ठेवावे, अशी मागणी करण्यात आली.

माहे सप्टेंबरचे, ऑक्टोबरमध्ये अदा होणारे वेतनपत्रक स्वीकारले जात नसल्याने संबंधित कर्मचाऱ्यांना या महिन्याचे वेतन मिळण्याबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. वेळेवर वेतन न मिळाल्यास गृहकर्जाचे हप्ते, घरखर्च तसेच दैनंदिन आर्थिक गरजा भागविताना कर्मचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. नवरात्र व दिवाळीच्या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांची आर्थिक कोंडी होऊ नये, यासाठी शिक्षणमंत्र्यांनी या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून वेतनाचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी शिक्षक भारतीने केली आहे.

# लावणी कलावंत महासंघाची 2026-2029 ची कार्यकारणी निवड

**मुंबई :** लावणी कलावंत महासंघाची कार्यकारणी निवडणूक २८ सप्टेंबर रोजी दादर येथील दादर माटुंगा कल्चरल सेंटर मध्ये सभासदांच्या उपस्थिती मध्ये डॉ. सचीन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. संस्थापक अध्यक्ष श्री.संतोष लिंबोरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली कविता घडशी यांची पुन्हा एकदा अध्यक्षपदी नियुक्ती झाली तर जयेश चाळके यांची सरचिटणीसपदावर बिनविरोध निवड झाली.

खजिनदार श्री.विशाल सदाफुले,कार्याध्यक्ष आकांक्षा



कदम,समन्वयक विद्या सदाफुले यांची निवड झाली.उपाध्यक्ष श्री. विजय कर्जावकर, चिटणीस श्री. संदेश गायकवाड, उपकार्याध्यक्ष नम्रता वेस्वीकर तर कार्यकरणीवर रोशनी म्हात्रे, अजय जाधव,सुनील खंडागळे,चंद्रकांत तांबे,विशाल गिलबिले, हर्षला राऊत डागळे तर मीडिया प्रमुख पदावर भीमराव धुळप यांची सर्वानुमते निवड झाली.यावेळी उत्सव कमेटी देखील निवडण्यात आली.सदर निवड ही २०२६ ते २०२९ या तीन वर्षांच्या कालावधी करिता करण्यात आली.

## बंगलोर निखिल प्रॉडक्टस्ची वंदन अगरबत्ती बाजारात !

**मुंबई :** वंदन अगरबत्ती ही येणाऱ्या गणपती, दसरा, दिवाळी या सणांसाठी काही अप्रतिम प्रॉडक्टस् बाजारात उपलब्ध केली आहेत. वंदन अगरबत्तीच्या सुगंधामुळे वातावरण प्रसन्न व शांत रहाते. ही अगरबत्ती अधिक वेळ जळत रहाते व तिचा सुगंध बराच वेळ दरवळत रहातो. उपरफ्यूमपासून वंदन अगरबत्ती ही उच्च प्रतिच्या चंदनाच्या वासू बनवलेली अगरबत्ती आहे. चंदनाचा खरा सुगंध काय असतो हे जर अनुभवायचे असेल तर एकदा तरी वंदन अगरबत्ती वापरलीच पाहिजे. आराध्य, साक्षी, स्वरा, अन्नपूर्णा, मॅगनेट आदी या सर्व अगरबत्ती ५० ग्रॅम पॅकेटमध्ये बाजारामध्ये उपलब्ध आहेत. ट्राईवो व अमोघ लाँग स्टीकमध्ये आहेत. तसेच कोन जारमध्ये सर्व प्रकारचे धूप उपलब्ध आहेत. तरी सर्व ग्राहकांनी आमची ही नवीन उत्पादने विकत घेऊन उत्सवाचा व सणांचा आनंद द्विगुणीत करावा ही अपेक्षा. मुंबई अगरबत्ती विक्रेते संपर्क : आचार्य प्रॉडक्टस, ६, संगीत सागर, लक्ष्मी नारायण, माटुंगा (पूर्व), मुंबई ४०० ०१९. संपर्क : फोन - २४०२४४९१ / २४०२६६९१ या नंबर वर संपर्क करावा.

# अंकुश महाराज कुमठेकर यांना समाज रत्न पुरस्कार प्रदान




**अंबरनाथ :** 'आदर्श रायगड' वृत्तपत्र व वृत्तवाहिनीच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून अध्यात्म, समाजप्रबोधन व समाजसेवेचे कार्य करणारे ह.भ.प. अंकुश महाराज कुमठेकर यांची 'समाज रत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. त्यांच्या वारकरी संप्रदायातील योगदानासह सामाजिक व समाजप्रबोधनात्मक कार्याची दखल घेत हा सन्मान त्यांना मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे त्यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# लोकमान्यनगर प्रियदर्शिनी सोसायटीत सौर पॅनल बसविण्याच्या कामाचा शुभारंभ



**मुंबई:** लोकमान्यनगर प्रियदर्शिनी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित येथील इमारत क्र. १ व इमारत क्र. २ वर सौर पॅनल बसविण्याच्या विकासकामाचा शुभारंभ आज उत्साहात करण्यात आला. या प्रकल्पामुळे सौरऊर्जेचा वापर वाढून वीज बचत, पर्यावरण संवर्धन तसेच स्वच्छ व शाश्वत ऊर्जेला प्रोत्साहन मिळणार आहे. पारंपरिक ऊर्जास्रोतांवरील अवलंबित्व कमी करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. सौरऊर्जेचा प्रभावी वापर करून संस्थेतील रहिवाशांना भविष्यात ऊर्जा बचतीचा लाभ मिळण्यास मदत होईल. पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दिशेने संस्थेने उचललेले हे महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे यावेळीसांगण्यात आले

Printed and published by Bhimrao Hindurao Dhulap, Printed at Prachita Print E/103 Amit Apartment Akansha Complex Laxmiben Cheda Road Nilemore. Nallasopara (w), Palghar, Maharastra -40103. and published at C/66, Mukund Nagar, A-Ward, Laxmi Mandir, Dharavi, Mumbai -400 017.
**Editor: Bhimrao Hindurao Dhulap,** Mob. 9221117684 (Any litigation against the content will be entertained under the jurisdiction of Mumbai only. )

हे साप्ताहिक प्रकाशक, मुद्रक, मालक श्री. भिमराव हिंदुराव धुळप यांनी प्रचिता प्रिंट इ/ आकांक्षा कॉम्प्लेक्स, लक्ष्मीबेन छेडा रोड, नीलमोर नालासोपारा ( पश्चिम) पालघर, महाराष्ट्र ४०१२०३ येथून छापून सी/६६ मुंकुंदनगर, ए/ वॉर्ड, लक्ष्मी मंदिर, धारावी, मुंबई ४०००१७ येथून प्रकाशित केले. **संपादक भिमराव हिंदुराव धुळप.** मो. ९२२१११७६८४
(प्रकाशित बातम्या / लेखांशी सहमत असतीलच असे नाही सर्व वाद मुंबई न्यायकक्षेत)